**म. ए. सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर**

हीरकमहोत्सवानिमित्त आयोजित

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

**९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,**

**भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी,**

**उदगीर जि. लातूर ४१३५१७**

कामाचे नाव

संमेलनासाठी आयोजित विविध कार्यक्रमांकरीता चहा, नाश्ता व भोजनाच्या पुरवठ्यासाठी
निविदा सूचना

**पुरवठा कालावधी २१ एप्रिल २०२२ ते २५ एप्रिल २०२२**

**संदर्भ** : **अ भा म सा सं** ९५/ **उदगीर/भोजन**/७-२७/०२

**संपर्क**

अधिक माहितीसाठी कृपया https://abmss95.mumu.edu.in या संकेत स्थळावर भेट द्यावी.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | निविदेविषयक वेळापत्रक आणि संपर्क तपशील | ३ |
| २. | निविदा भरण्यासंदर्भातील सूचना | ४ |
| ३. | निविदेसंबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती | ७ |
| ४. | प्रपत्र – १ | ११ |
| ५. | प्रपत्र – २ | १२ |
| ६. | प्रपत्र – ३ | १३ |
| ७. | प्रपत्र – ४ | १५ |
| ८. | प्रपत्र – ५ | १६ |
| ९. | प्रपत्र – ६ | १७ |
| १०. | शिफारस पत्र | १८ |
| ११. | चहा, नाश्ता व भोजनासंबंधी मेनुचा तपशील | १९ |
| १२. | व्यापारी लिफाफा (BOQ) | २१ |

# निविदा विषयक वेळापत्रक व तपशील

## (अ) १. निविदेचा संक्षिप्त तपशील पुढील प्रमाणे आहे.

| कामाचा तपशील | कामाची अंदाजित रक्कम | निविदा फॉर्मची किंमत व बयाणा र. | कार्यक्रमाचे ठिकाण, तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी भोजन, अल्पोपहार, चहा, कॉफी, बिस्किट इपुरवठाकरणे . ..बाबत | वीस लक्ष रुपये अंदाजे फक्त २०,०००००/- | निविदा फॉर्मची किंमत — ५०००/- पाच हजार फक्त मात्र व बयाणा रक्कम — ५०,०००/- पन्नास हजार फक्त | ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कार्यालय, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर साहित्य नगरी उदगीर जि. लातूर - ४१३५१७ दि.२१/०४/२०२२ सकाळी ०७.०० **पासून** २५/०४/२०२२ रात्री१० .वाजेपर्यंत ०० |

## २. निविदेचे संक्षिप्त वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | निविदा प्रसिध्दी | दि. १९/०३/२०२२ वेळ सायं. ०६.०० वा. |
| २. | निविदा फॉर्म डाऊन लोडिंगविक्री / | दि. १९/०३/२०२२ वेळ सायं.६.३० पासून |
| ३. | निविदा फॉर्म स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. २५/०३/२०२२ वेळ सायं. ०६.०० वाजेपर्यंत |
| ४. | निविदा उघडणे दिनांक वेळ व ठिकाण | दि. २६/०३/२०२२ वेळ सकाळी ११.०० वाजता संमेलन कार्यालय |

**निविदाविषयक चौकशीसाठी संपर्क**

१. श्री. एस. एन. हल्लाळे ७५८८३९०४०१

२. श्री. एस. ए. मुळे ८२७५४८२३०२

३. श्री. बी. एस. कांबळे ९०९६२३०९११

# निविदा भरण्यासंबंधीच्या सुचना

संमेलनामध्ये विविध परिसंवाद, कवि संमेलन, चर्चासत्र, परिषदा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते. या कार्याक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या सहभागीसाठी चहा, नाश्ता व दोन वेळेचे भोजन व्यवस्था भोजन समिती मार्फेत करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने २१ एप्रिल २०२२ ते २५ एप्रिल २०२२ या कालावधीत विविध कार्यक्रमासाठी एका वेळेस किमान १०० कमाल ५००० व्यक्तीकरीता (आवश्यकते प्रमाणे हि संख्या कमी/अधिक होऊ शकते) चहा, नाश्ता व दोन वेळा भोजन व्यवस्थेसाठी पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा भरण्यासंबंधीच्या सुचना खालील प्रमाणे आहेत.

१. कोऱ्या निविदा, अटी व शर्तीसह संमेलनाच्या https://abmss95.mumu.edu.in या संकेत स्थळावर व संमेलनाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. भरलेली निविदा प्रत्यक्ष कार्यालयात आणुन द्यावयाची आहे. निविदा दोन लिफाफा पध्दतीने भरावयाच्या आहेत.

२. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज निविदा अर्जा सोबत स्वतंत्र पॉकीटात कार्यालयात सादर करावे तसेच अर्जाची किंमत व रोख, ऑनलाईन किंवा धनाकर्षाद्वारे भरावी व पावती अर्जासोबत जोडावी.

३. निविदे मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या निकषानुसार सर्व कागदपत्रे निविदा क्रमांक ०१ मध्ये (तांत्रीक लिफापा) सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय वित्तीय दराच्या निविदा, (Price Bid) उघडण्यात येणार नाही.

४. इतर सुचना, बयाना रक्कम, चहा, नाश्ता व भोजन ठेका अंदाजित किंमत या बाबतची माहिती , अटी शर्ती निविदा नमुन्यात पहावयात मिळतील. सदर निविदा मंजूर करणे , त्यामधील अटी व शर्ती वाढ करणे किंवा शिथिल करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रीयेत बदल करणे अथवा संपूर्ण निविदा प्रक्रीय रद्द करणे, इ. बाबतचे संपूर्ण हक्क व निर्णय संमेलन स्वागत समितीने/मंडळाने राखुन ठेवले आहेत.

५. इंटरनेट, विघुत बिघाड इत्यादी करणामुळे निविदा सादर करण्यात विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संमेलन आयोजकाची राहणार नाही. ई-मेल, फॅक्स, ऑनलाईन, इ. द्वारे सादर केलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. निविदा कार्यालयातच प्रत्यक्ष सादर करुन पोहोच पावती घ्यावी व निविदा उघड करतेवेळेस ते सादर करणे बंधंनकारक राहील.

६. आपल्या बॅंकेचे पासबुक किंवा चेकचे छायाप्रत किंवा रद्द केलेला चेक सोबत जोडणे आवश्यक आहे.

७. पात्र ठेकेदारांना दरांबाबत वाटाघाटीसाठी बोलविण्यात येईल त्याच वेळेस मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल.

८. दरांबाबत वाटाघाटीअंती सारख्या दरांचे आवश्यकतेनुसार निविदा धारक निश्चित करण्यात येतील व त्यांना संमेलन आयोजकातर्फे आवश्यकते नुसार कामाचे कार्यादेश देण्यात येतील.

९. काही अपरिहार्य कारणामुळे वरील ठिकाण, वेळेत व दिनांकास निविदा उघडणे शक्य नसल्यास निविदा प्रक्रिये बाबत होणाऱ्या बदलाचा तपशील अथवा तशी सुचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. या बाबत स्वतत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

१०. चहा,नाश्ता व भोजना बाबतचा तपशील निविदा फॉम मध्ये नमुद करण्यात आला आहे.

११. निविदा उघडतांना प्रथम लिफाफा क्र. १ तांत्रिक उघडुन त्यामध्ये कागदपत्रांचे व अटी शर्तींची पुर्तता केली असल्याची खातरजमा करण्यात येईल. त्यामध्ये त्रुटी आढळल्यास निविदा धारकांने दिलेला लिफाफा क्रमांक २ (दरपत्रक लिफाफा क्रमांक २) उघडण्यात येणार नाही व त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

१२. निविदेच्या नमुन्यात सर्व कागदपत्रे निविदेमध्ये जोडणे आवश्यक आहेत. तसेच सदरची कागदपत्रे मुळ प्रतित किंवा स्वाक्षांकित केलेली असणे आवश्यक आहे.

१३. सदर निविदा हि तांत्रिक कारणांमुळे किंवा इतर प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्याचे अधिकार संमेलन स्वागताध्यक्ष / कार्याध्यक्ष यांनी राखुन ठेवलेला आहे.

१४.निविदा धारकाने निविदा प्रक्रीयेतून कोणत्याही टप्यावार माघार घेतल्यास त्याची निविदा शुल्कासह बयाणा रक्कम जमा करून त्यांना काळया यादीत टाकण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५.निविदा धारकाकडुन , निविदा प्रस्ताव मागे घेणे, प्रस्तावात फेरफार करणे, करारावर सही न करणे, प्रस्ताव स्वीकृतीनंतर सुरक्षा अनामत न भरणे, अन्य अटीची पुर्तता न करणे अशा जोखमीच्या बाबतीत पूर्तता न झाल्यास बयाना रक्कम जप्त करण्याचे अधिकार संमेलन आयोजकांना राहतील.

१६.निविदा धारकाने आपली आर्थिक ऐपत रुपये २५,००,०००/- (पंचेवीस लक्ष रुपये केवळ) एवढी असल्याबाबत सनदी लेखापाल यांचे ऐपत प्रमाणपत्र पुरावा/अथवा बँक गॅरंटी देणे आवश्यक असेल, त्याच्या मुळ प्रति आपला ठेका मंजूर केल्यावर सादर करणे बंधनकारक असेल.

१७.उपरोक्त अटी व शर्तीबाबत काही अडचणी असल्यास, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुरध्वनी क्रमांकावर किंवा प्रत्यक्ष संपर्क साधून अडचणींचे निवारण करुन घेता येईल. निविदा कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडून ऑनलाईल सुचना प्रसिद्धीअन्वये बैठक , सभा बोलवण्यात आल्यास किंवा निविदा उघडतेवेळी फक्त निविदाधारक किंवा त्यांचे द्वारा प्राधिकृत प्रतिनिधी यांनाच उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाईल.

१८.सदर कामाचे स्वरुप , निविदा अटी व शर्ती इत्यादीची माहिती निविदा पत्रकात उपलब्ध आहेत. परिपुर्ण भरलेल्या निविदा, निविदा सुचनेत , दिलेल्या निर्देशानुसार सादर करण्यात याव्यात. निविदा

संबंधी मुदतवाढ, दुरुस्ती , सुचिमधील बदल , इत्यादी बाबी वृत्तपत्रात जाहिर केल्या जाणार नसुन त्याबाबत ची माहिती संमेलनाच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. निविदेमधील सर्व पानावर स्वाक्षरी करून सादर कराव्यात.

१९. (अ) निविदेच्या प्रत्येक पानावर निविदेतील अटी व शर्ती मान्य आसल्याबाबत संमती दर्शक संपूर्ण सही व शिक्का असणे आवश्यक आहे. कुठल्याही प्रकारची खाडाखोड ओव्हर रायटींग आढळल्यास निविदा अपात्र समजण्यात येईल.

(ब) निविदे सोबत अधिकृत साक्षांकित दस्ताऐवजांच्या प्रति जोडाव्यात

(क) निविदेत नमुद केलेल्या दस्ताऐवजां व्यतिरिक्त इतर काही दस्ताऐवज मागणी केल्यास ते देखील सादर करणे. निविदा धारकावर बंधनकारक राहील.

(ड) जी व्यक्ती अज्ञान आहे किंवा दिवाळखोर म्हणून जाहीर झालेली आहे किंवा भारतीय दंड विधान कायद्याअंतर्गत एखाद्या गुन्ह्यात न्यायालयाने दोशी जाहीर केलेली असेल किंवा अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये ती व्यक्ती नैतिक मुल्य भ्रष्ट करण्याकामी समाविष्ट असेल किंवा जी व्यक्ती गुन्हेगारी स्वरुपाच्या कामात समाविष्ट असेल किंवा काही काळापुरता प्रतिबंधात्मक कायद्याखाली स्थानबध्द केलेली असेल किंवा केंद्रशासन, राज्यशासन किंवा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी उदगीर, जि. लातूर यांनी त्या व्यक्तीस / संस्थेस काळ्या यादीस टाकलेली असेल अशी व्यक्ती/संस्था निविदा भरण्यास अपात्र समजण्यात यावी. अशा व्यक्तीने अथवा संस्थेने जर निविदा सादर केली तर ती रद्द समजण्यात येईल.

(इ) प्रत्येक पानावर निविधा धारकांद्वारा स्वाक्षरीकृत निविदा विषयक दस्तऐवजांचा पूर्ण संच ठेकेदाराने प्रत्येक्ा कार्यालयात दाखल करणे अनिवार्य असेल.

**स्वागताध्यक्ष / कार्याध्यक्ष / कोषाध्यक्ष**

**९५वे अ.भा.म.स.सं.२०२२ उदगीर.**

# निविदा संबंधीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

१. म. ए. सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर हीरकमहोत्सवानिमित्त आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर जि. लातूर संमेलनामध्ये विविध परिसंवाद, कवि संमेलन, चर्चासत्र, परिषदा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्याक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या सहभागीसाठी चहा, नाश्ता व दोन वेळेचे भोजन व्यवस्था भोजन समिती मार्फेत करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने २१ एप्रिल २०२२ ते २५ एप्रिल २०२२ या कालावधीत विविध कार्यक्रमासाठी एका वेळेस किमान १०० कमाल ५००० व्यक्तीकरीता (आवश्यकते प्रमाणे कमी/अधिक होईल) चहा, नाश्ता व दोन वेळा भोजन व्यवस्थेसाठी पुरवठादारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

२. बयाणा रक्कम व निविदा रक्कम : ठेकेदाराने निविदा भरतांना निविदा अर्जाची किंमत रुपये ५,०००/- (अक्षरी पाच हजार रुपये मात्र) व बयाणा रक्कम ५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार रुपये मात्र) नेट बँकींग (Online) किंवा( डि डि ) धनाकर्ष द्वारे भराव्याची आहे. निविदे सोबत सक्षम अधिकारी यांनी निर्गमीत केलेल्या परवान्याची साक्षांकित केलेली सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने त्यास ओळखणाऱ्या दोन व्यक्तींचे हमीपत्र निविदे सोबत दिलेल्या नमुन्या प्रमाणे जोडावे.

३. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर निविदा धारकास बयाणा रक्कम परत करण्यात येईल. अशी रक्कम परत करण्यास उशीर झाल्यास निविदाधारकास कोणत्याही प्रकारचा व्याज मागण्याचा अधिकार राहणार नाही.

४. ज्या ठेकेदाराची निविदा स्विकृत केली जाईल त्यास कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर सात दिवसांच्याआत आनामत रक्कम रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख फक्त ) डिडि च्या स्वरुपात जमा करावी लागेल. कराराचा कालावधी संपल्यानंतर सुरक्षा रक्कम (बिना व्याजी) परत केली जाईल.

५. निविदा स्विकृत केलेल्या ठेकेदारास अटी व शर्ती करारनामा नियमानुसार देय असलेल्या मुद्रांक शुल्क पेपरवर (स्टँम्प) लिखीत स्वरूपात द्यावा लागेल.

६. ठेकेदाराला काही कारणास्तव नेमून दिलेल्या करार कालावधीच्या आत, ठेका रद्द करण्याच्या तारखेपुर्वी ३० (तीस) दिवस आगोदर लेखी पत्राद्वारे सबळ कारणासह मा. कार्याध्यक्ष , ९५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर यांना कळवीणे आवश्यक राहील. तसे न केल्यास नमुदअटी व शर्ती नुसार त्यांची संपूर्ण सुरक्षा आनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७. ठेका दुसऱ्यास हस्तांतरीत करण्यात येणार नाही. पोट-ठेकेदार नेमता येणार नाही. तसे आढल्यास कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

८. ठेकेदाराची आणि त्यांच्या नोकरवर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपूर्ण असली पाहिजे.

९. काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ठेकेदाराची राहील. त्याकरीता योग्य तो विमा ठेकेदाराने करणे आवश्यक असेल.

१०. कार्यक्रमाच्या वेळी इमारतीचे व फर्निचरचे तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास नुकसान हे संबंधीत ठेकेदाराकडून वसूल केले जाईल.

११. कार्यक्रमाच्या वेळी भोजनाच्या ठिकाणी स्वागत समिती सदस्य , म.ए.सोसायटीचे सदस्य तसेच महामंडळाचे पदाधिकारी किंवा सर्वेच्च अधिकारी केव्हा ही भेट देतील व खाद्यपदार्थीची प्रतवारी तपासतील. खाद्य पदार्थाची प्रतवारी कमी दर्जाची असल्यास कंत्राट रद्द करण्याचा अधिकार स्वागताध्यक्ष /कार्याध्यक्ष यांना राहतील.

१२. ठेकेदाराने त्याच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संपूर्ण कामगार कायदे, स्थायी आदेशांचे वेळोवेळी पालन बंधनकारक राहील.

१३. ठेकेदारांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी कोणाशीही वादविवाद न करता संबंधीताबाबत तक्रार असल्यास कार्यक्रम व्यवस्थान कार्यालयात त्वरीत संपर्क करावा.

१४.दोन सन्माननीय व्यक्तींच्या सहिचे चारित्र्य पडताळीणी दाखला आवश्यक आहे.

१५. चहा, नाष्ता किंवा जेवण करीत असतांना जर ताटामध्ये पाल, अळी , किडे, झुरळ इ. सारखे किटक आढळून आले आणि त्याबाबत ची तक्रार संबंधितांनी केली तर, याबाबत चौकशी केल्यानंतर त्वरीत मा. कार्याध्यक्ष यांना अहवाल सादर करून तक्रार निवारण समिती चौकशी करून योग्य ती कार्यवाही करतील. गरज भासल्यास महाराष्ट्र शासनाचे अन्न व औषधी विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करून कार्यवाही करण्यात येईल.

१६. वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्यासंदर्भात ठेकेदाराचे म्हणने ऐकून घेवून सदर ठेका रद्दकरण्याचा सर्व अधिकार मा. कार्याध्यक्ष यांना राहिल.

१७.कार्याक्रमात उरलेले अन्न, खरकटे व इतर अनावश्यक वाया जाणारे पदार्थीचे विहीत केलेल्या ठिकाणी विल्हेवाट लावणे ठेकेदारास बंधनकराक राहील

१८. कार्यक्रमाचा आजूबाजूचा परीसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पुरवठा धारकाची राहील. अस्वच्छता आढळून आल्यास कारवाई करून दंड आकारण्यात येईल.

१९. स्वयंपाकारीता लागणारी भांडी तसेच या व्यतिरिक्त इतर साहीत्य (गॅस यंत्रणा इत्यादी) आणि नौकर - वर्ग यांची व्यवस्था भोजन पूरवठादारांने स्वत: करावी पूरवठादारास कोणत्याही ईमारतीचा वापर करता येणार नाही. (उदा. स्वयंपाककरणाऱ्या कर्मचाऱ्यांची निवासाची व्यवस्था इ.) पूरवठादारांच्या कोणत्याही वयक्तीक अटी व शर्ती असलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही. तसेच भोजन पूरवितांना स्वयंपाकासाठी निरोगी कर्मचारी नेमावे लागतील, व स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल. चहा, नाष्ता व भोजन तयार करण्याकरीता घरगुती गॅस सिलेंडर्सचा वापर न करता सर्व निविदाधारकांनी व्यावसायीक गॅस सिलेंडर्सचाच वापर करावा. व बाल कामगार नेमता येणार नाहीत.

२०. वेळोवेळी केलेल्या मागणी नुसार ठेकेदारांनी चहा, नाश्ता व भोजनाचा पूरवठा न केल्यास, अशा प्रसंगासाठी ठेकेदारास रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार मात्र) प्रति घटनेस दंड आकारण्यात येईल. तसेच चहा, नाश्ता व भोजनाची प्रायोजकांनी पर्यायी व्यवस्था केल्यास, त्यासाठी मंजूर दरापेक्षा लागणारा जादा खर्च ठेकेदारकडुन वसूल करण्यात येईल.

२१. चांगल्या प्रतिचे नाष्टा, चहा व भोजन देणे निविदा धारकास बंधनकारक राहील. चहा, नाष्टा व भोजनातून विषबाधा सारखे काही प्रकार घडल्यास निविदा धारकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी पूरवठा धारकांची / निविदाधारकाची राहील.

२२.सदर निविदेतील एखादी किंवा अधिक अटी शिथिल करण्याचा व अर्थ लावण्याचा, कोणतीही निविदा पूर्णत: अथवा अंशत: मंजूर करण्याचा, तसेच एखादी अगर सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार हे स्वागत समितीने राखून ठेवलेला आहे.

२३.ठेकेदाराने भोजनठेका अचानक बंद केल्यास, वारंवार चहा, नाष्ता व भोजन नियमित व वेळेवर न पुरविल्यास, तसेच निकृष्ठ दर्जाचे चहा, नाश्ता व भोजन दिल्यास त्यांचा भोजन ठेका रद्द करून सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, तसेच त्यांची नावे काळया यादीत टाकण्यात येईल.

२४. कोणत्याही परिस्थितीत मंजूर दरामध्ये वाढ केली जाणार नाही. तसेच निविदेच्या दराबाबत आवश्यकता वाटयास वाटाघाटी करण्याचा अधिकार नियंत्रण समितीस / आयोजक समितीस राहिल.

२५.कार्यक्रमासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅस यंत्रणेच्या सुरक्षितेची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील. तसेच स्वयंपाकाच्या ठिकाणी दुर्घटना घडल्यास होणाऱ्या संभाव्य नुकसानाची जबाबदारी सुध्दा ठेकेदाराची राहील.

२६.करारनामा करातांना वाढीव अटी व शर्तीचा अंतर्भात करण्याचा अधिकार मा. स्वागताध्यक्ष यांनी राखून ठेवला आहे.

२७. चहा, नाश्ता व भोजन पूरवठ्याकामी वापरण्यात येणारे दुध, अन्नधान्य-किराणा माल, भाजीपाला, तसेच तयार केलेले अन्नपदार्थ यांचे दर्जाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अन्न व औषध प्रशासन विभागाकडून मालाचा दर्जा तपासण्यात येईल. भोजन पदार्थ तपासणीचा सर्व खर्च नियमानूसार पूरवठाधारक यांनी करणे बंधनकारक राहील. त्याअन्वये भोजन पदार्थाचे दर्जाबाबत तपासणीअंती तक्रारीबाबत तथ्य आढळून आल्यास संबंधीतावर प्रचलित कायद्यातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल व पुरवठा आदेश तत्काळ रद्द करून काळया यादीत समावेश करण्यात येईल.

२८.चहा, नाष्ता किंवा जेवन करीत असतांना जर विष बाधा कोणत्याही प्रकारचा शारिरिक त्रास झाल्यास भोजन ठेका धारकास जबाबदार धरण्यात येऊन दंडात्कम अथवा फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल् व महाराष्ट्र शासनाचे अन्न व औषधी विभागातील अधिकारी यांचेशी संपर्क करून कार्यवाही करण्यात येईल.

२९.विवाद (Disputes) व कार्यक्षेत्र (Jurisdiction) : सदर चहा नाष्ता व भोजन ठेका निविदेबाबत निविदा धारक व स्वागत समिती यांच्यात कूठल्याही स्वरुपाचा वाद निर्माण झाल्यास मा. स्वागताध्यक्ष / कार्याध्यक्ष यांनी दिलेला निर्णय अंतीम व दोन्ही वादी तथा प्रति वादी पक्षांवर बंधनकारकराहील. या करारनाम्यामुळे कुठल्याही प्रकारचा वादविवाद उद्भवल्यास तो अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय, उदगीर यांच्या कार्यकक्षेतच दाखल करता येईल.

३०.ठेकेदारास उपरोक्त कामासाठी अथवा साहित्या पोटी अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

३१.ठेकेदारानी भरलेली निविदा स्वीकारल्यास, पत्राद्वारे कळविण्यात येईल. ज्यांच्या निविदा स्विकृत होणार तसेच कोणतीही निविदा कारण न देता स्वीकारण्याचा अथवा फेटाळण्याचा अधिकार स्वागत समितीने राखून ठेवला आहे.

३२.ठेकेदाराने चहा, नाश्ता व भोजनासाठी आवश्यक वस्तू उच्च दर्जाच्या व अग्रामानांकींत असलेल्या खरेदी कराव्यात. तसेच नाश्ता व भोजनासाठी शुध्द सुर्यफुल/शेंगदाणा/करडई तेल वापरावे.

३३.ठेकेदाराने पूरविलेले खाद्यपदार्थ भेसळयुक्त असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत ठेकेदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

३४. कार्यक्रमाच्या ठिकाणी व परिसरात कोणत्याही साहित्याची नासधूस, मोडतोड, चोरी , अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसान ठेकेदाराला भरुन द्यावे लागेल.

३५.कार्यक्रमाच्या ठिकाणी किंवा परिसरात धुम्रपान, गुटखा, तंबाखुयुक्त पदाथे, तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादींची विक्री किंवा सेवन करता येणार नाही.

३६.ठेकेदाराला कार्यक्रमाच्या बाहेर अन्नाचे पार्सल देता येणार नाही.

३७. अन्न व औषध प्रशासनाच्या सर्व नियम व कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

३८.खाद्यपदार्थ बनविण्यासाठी मिनरल वॉटर वापरावे लागेल. भांडे धुणे व इतर वापरासाठी पाणी पुरवठा आयोजक करतील परंतू साठवणूक व्यवस्था पुरवठाधारकाने करावयाचे आहे.

३९. संमेलनाशी संबंधीत कोणत्याही सदस्यास किंवा त्यांचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाहीत. ठेकेदाराची अनामत रक्कम ठेका संपल्यानंतर कार्यक्रम व्यवस्थापन कक्षाकडून ना देय प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच परत करण्यात येईल.

४०. संमेलन स्थळी नाश्ता भोजन, चहापाणी इ. वितरीत करण्याची जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची असेल. या करीता आवश्यक तेवढे गणवेशातील वाढपी, अन्न पदार्थं वाहक, पिण्याचे पाणी वाटप करणारे व्यक्ती आणि त्यासाठी लागणारे साहित्य आवश्यकतेनुसार पुरवण्याची जबाबदारी ठेके दाराची असेल

४१.कुपनधारक व्यक्तींनाच चहा, नाश्ता व जेवण दिले जात आहे याची खात्री ठेकेदारांने करावे कुपनच्या आधारेच ठेकेदाराचे देयक दिले जातील.

**कार्याध्यक्ष**
**९५वे अ.भा.म.स.सं. उदगीर.**

**वरील सर्व अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचून व समजून घेतल्या असून त्यांचे मी तंतोतंत पालन करीन**

**स्थळ :** **निविदा धारकाचे नाव :**

**दिनांक : / /२०२२** **शिक्का व स्वाक्षरी**

# प्रपत्र – १

## निविदाधारकाचा वार्षिक उलाढालीबाबत सनदी लेखापालाचा (Chartered Accountant) दाखला

प्रमाणित करण्यात येते की, ___________________________________यांच्या खाली नमूद केलेल्या बँकांच्या खात्यातील तपशील आणि वार्षिक ताळेबंद आमच्या मार्फत तपासण्यात आलेला असून, त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन त्यांची वार्षिक उलाढालीचा वर्षनिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | खातेदाराचे / निविदाकाराचे नाव | आर्थिक उलाढालाचे वर्ष | एकूण वार्षिक उलाढाल रक्कम |
|---|---|---|---|
| | | **सन २०२०-२१** | |
| | | **सन २०१९-२०** | |
| | | **सन २०१८-१९** | |

ठिकाण :

दिनांक : / /२०२२ **सनदी लेखापालाची**

**स्वाक्षरी व शिक्का व संपर्क क्रमांक**

**टिप : या ठिकाणी निविदा भरणारे निविदाधारकाचे नाव अपेक्षीत आहे.**

- **निविदाधारकाचे नाव**
- **फर्मचे नाव**
- **पुर्ण पत्ता**

# प्रपत्र — २

## पूर्व अर्हता मुल्यांकन परिक्षण नमुना

१. **निविदा ज्यासाठी भरावयाची आहे ते नाव :**

२. **निविदेचा क्रमांक :**

३. **निविदाकाराचे नाव व पत्ता :**

| अ.क्र. | ज्या शासकीय / निमशासकीय संस्थेत भोजन ठेक्याचे काम केलेले आहे त्या संस्थेचे / कार्यालयाचे नाव व संपूर्ण पत्ता | पुराव्याकरीता पुरवठा आदेश व अनूभव दाखला जोडलेला आहेत काय ? होय / नाही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |

सोबत पुराव्याचे पुरवठा आदेश व अनुभव दाखला स्वसांक्षांकित करून सादर करणे बंधनकारक आहे.

दिनांक : / /२०२२

**निविदाकाराचे नाव :**
**व पत्ता :**

**मोबाईल क्रमांक :**

## <u>प्रपत्र-३</u>

## चहा, नाश्ता व भोजन पुरवठा निविदेकरीता निविदाधाराने द्यावयाचे हमीपत्र

मी. श्री. / श्रीमती----------------------------------- पुर्व जाणीवतेने स्वखुशीने निविदा प्रक्रियेकामी विनाशर्त हमीपत्र लिहून देतो / देते की, या निविदा अर्जात नमुद केलेली माहीती माझे संपुर्ण माहीतीनुसार खरी आहे. तसेच निविदा फार्म मधील नमुद सर्व अटीशर्ती ह्या मी स्वत: वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सदरच्या अटी-शर्तीचे कोटेकोरपणे पालन करण्यास मी बांधील आहे. तसेच वित्तीय अनुपलब्धता अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे चहा, नाश्ता व भोजन पुरवठा देण्याची रक्कम अदा करण्यास उशिर झाल्यास त्यावर व्याज दिले जाणार नाही हे मला मान्य असून सदर बाबत मला न्यायालयात दाद मागता येणार नाही. चहा, नाश्ता व भोजन पुरवठा अथवा तदनषंगिक व्यावसायिक सेवा पुरवठ्याबाबत शासनाच्या कोणत्याही विभागाने, कार्यालयाने किंवा शासनाच्या अधिकृत महामंडळ, सार्वजनिक उपक्रम व इतर शासकीय संस्था यांच्याव्दारे मला / आम्हाला सदर निविदा कालावधीकरीता बंदी / मनाई निलंबन आदेशान्वये काळ्या यादीत ( Black Listed ) समाविष्ट केलेले नाही अथवा माझ्या / आमच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणी कायदेशीर कार्यवाही प्रस्तुत नाही.

निविदा प्रक्रियेसाठी ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संयोजक समिती येथील निविदा अनुपालनास्तव नमुद केलेल्या उपरोक्त सर्व अटी व शर्ती अ.क्र. ०१ ते ४१ ह्या मी / आम्ही प्रत्यक्ष वाचल्या असून मला / आम्हाला विनाशर्त मान्य आहेत. याबाबत माझी / आमची कोणतीही तक्रार नाही. आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची मी / आम्ही पुर्तता केली असून ते कागदपत्रे निविदेसोबत जोडली आहेत. निविदा प्रक्रियेकामी आवश्यक कागदपत्र मी / आम्ही सादर केली नसल्यास मला / आम्हाला अपात्र ठरवून निविदा प्रक्रियेतुन वगळयाचा संपूर्ण अधिकार समितीस आहे याची मला / आम्हाला पूर्ण जाणीव आहे. सदर निविदा प्रक्रियेअंती माझी निविदा मंजुर झाल्यास वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत मी स्वखर्चाने रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनागा करुन देण्यास मी विनाशर्त विनातक्रार तयार आहे.

तसेच निविदेच्या बाबतीत काही सूचना / अपेक्षा / तक्रारी असल्यास व्यापारी लिफाफा उघडण्याच्या पुर्वी पर्यंत अशा सुचना / अपेक्षा / तक्रारी या आपल्या कार्यालयाच्या या ई-मेल व्दारे सादर करण्याची देखील या व्दारे हमी देण्यात येत आहे.

मी / आम्ही सादर केलेले कागदपत्र / प्रमाणपत्र / अनुभवाचे दाखले आणि आर्थिक उलाढालीच्या संदर्भात दिलेले सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र खरे व बरोबर आहेत. तसेच त्यातील नोंदविलेली माहिती ही निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही टप्प्यावर प्राप्त आक्षेप / तक्रारीच्या अनुषंघाने चौकशी अंती अंशत: अथवा पूर्णत: खोटी तथा निविदा प्रक्रियेतून अपात्र घोषित करण्याकामी संदिग्ध व अपुर्णता असलेल्या दस्तऐवजांचा समावेश असल्याने आढळून आल्यास माझेवर / माझ्या संस्थेवर शासनाचे नियमानुसार उचित कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच माझी बयाणा रक्कम ( EMD ) जमा करण्यात येईल

आणि मला / आम्हाला कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव च्या निविदा प्रक्रिये करीता काळ्या यादीत प्रविष्ट करण्यात येईल याची मला पुर्ण जाणीव आहे.

निविदेत सादर केलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे व नोंदविलेली माहिती ही सत्य व पूर्णत: खरी असून त्यात कोणताही फेरफार करण्यात आलेला नाही. निविदा दस्ताऐवजात अपूर्ण, संदिग्ध किंवा जाणीवपूर्वक गैरउद्येशाने खोटी माहीती नमूद केल्याचे आढळल्यास निविदा प्रक्रियेतुन अपात्र घोषित केले जाण्यास व त्याअन्वये उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच माझी बयाणा रक्कम ( EMD ) जप्त करुन आमच्या संस्थेचा काळ्या यादीत ( Black Listed ) समाविष्ट करण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव असून मी / आम्ही कारवाईस पात्र राहील.

बालमजुरी, ककामगार कायदे, लैंगिक पिळवणूक, मानवाधिकार, पर्यावरणाची हानी, शासनाची फसवणूक प्रचलित कायद्यातील तरतूदींचे तसेच शासनाच्या नियमावलीचे आमच्याकडून काटेकोरपणो अनुपालन केले जात आहे. सदर बाबत माझ्यावर / आमच्यावर कुठल्याहही स्वरुपाची फौजदारी अथवा शासन नियमावलीचे उल्लंघन प्रकरणी अन्य गंभीर स्वरुपाची कारवाई प्रस्तावित नाही किंवा न्यायप्रविष्ट नाही.

उपरोक्त प्रमाणे निविदेत मी पुर्णत: सत्य व अचूक माहिती नोंदविलेली असून निविदा अटी-शर्तीनूसार सर्व तरतूदी मला विनाशर्त मान्य आहेत. त्यानुससार निविददेतील माहिती खोटी नोंदविल्याचे आढळल्यास निविदा अपात्र ठरण्यास व उचित कायदेशीर कारवाईस मी पात्र असेल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदाकाराचे नाव :--------------------------

पत्ता व  शिक्का :------------------------------

----------------------------------------------

स्वाक्षरी :-----------------------------------

# <u>प्रपत्र-४</u>

## चहा, नाश्ता व भोजन पुरवठा निविदेकरीता निविदाधाराने द्यावयाचे हमीपत्र

**नाव :**

**पत्ता :**

**दिनांक :**

प्रति,

**मा. कार्याध्यक्ष,**
**९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,**
**उदगीर**

**विषय : निविदा समिती मार्फत निश्चीत होणारे दर मान्य असल्या संदर्भात संमतीपत्रक**

महोदय,

मी / आम्ही आपल्या मार्फत सन २०२१-२२ या वर्षात ई-निविदेव्दारे ------------------------साठी प्रसिध्द झालेल्या निविदेत भाग घेतलेला असून समिती मार्फत ई-निविदा क्रमांक ------------ यास एक शहर एक दर या तत्वानुससार निश्चीत केलेले दर अथवा समितीने निश्चीत केलेले दर असून या संदर्भात कोणतीही हरकत नाही. निश्चित केलेले दर मला / आम्हाला मान्य आहेत. करीता संमती पत्रक लिहून दिलेले आहे. त्या दराने मी / आम्ही चहा, नाश्ता व भोजन पुरवठा करण्यास तयार आहोत.

स्वाक्षरी : -------------------------

# प्रपत्र – ५

पात्रतेविषयक ई-निविदेसोबत मुळ प्रती आपलोड करावयाच्या दस्तऐवजांची यादी ( लिफाफा क्र. 1 तांत्रिक निविदा )

| तपशील | कागदपत्र सादर केली आहेत किंवा कसे?<br>होय / नाही |
|---|---|
| निविदाधारकाचे संपूर्ण नांव | |
| निविदाधारकाचे संपूर्ण पत्ता | |
| दुरध्वनी क्रमांक | कार्यालय |
| | कंपनी |
| | मोबाईल क्रमांक |
| ई-मेल आय. डी. | |
| बयाना रक्कम | |
| व्यवसाय कर निपटारा प्रमाणपत्र | |
| पॅन क्रमांक (PAN No.) | |
| वस्तू व सेवा कर अंतर्गत GST नोंदणी क्र. | |
| संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र (दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये अथवा ग्रामपंचायत) | |
| संस्था नोंदणी आधिनियम 1950 किंवा 1860 (बचत गट नोंदणी सक्षम प्राधिकारी प्रमाणपत्र सूट लागू असल्यास) | |
| उद्योग आधारचे नोंदणी प्रमाणपत्र (निवीदा फॉर्म फी व बयाना रकमेतून सूट लागू असल्यास) | |
| अन्न व औषध प्रशासन यांच्याकडील नोंदणी प्रमाणपत्र | |
| सनदी लेखापालाचे उलाढाल संदर्भातील प्रमाणपत्र (प्रपत्र - 1) | |
| संबंधीत उत्पादकाचे प्राधिकार पत्र (लागू असल्यास) | |
| आयकर भरणा विवरणपत्र A.Y. 2020-21 | |
| संस्था / बचत गटाच्या नावे असलेले बँक खात्याचे पासबूक प्रत जोडली आहे काय? | |
| सरकारी / निमसरकारी / नामांकीत खाजगी संस्थामार्फत निर्गमीत अनुभवाचे प्रमाणपत्र (प्रपत्र - 2) | |
| आधिकृत प्रतिनीधीसाठीचे प्राधिकार पत्र (प्रपत्र - 6) | |
| निविदाकाराने प्रपत्र – 3 अन्वये सादर करावयाचे हमीपत्र | |
| दर मान्य असल्यास संदर्भात संमतीपत्रक प्रपत्र - 4 | |
| सदरचे प्रपत्र निविदा सोबत स्वाक्षरीने सादर करणे बंधनकारक राहील | |

टिप – 1. जोडलेल्या दस्ताऐवजासाठी ( √ ) अशी खून करावी

2. ठेकेदारानी या निविदेसोबत वरील कागदपत्राच्या छायांकीत साक्षांकीत प्रती जोडाव्यात

3. या कागदपत्राच्या मूळ प्रती निविदा तपासणीच्या वेळी संमेलन कार्यालयास उपलब्ध करुन द्याव्या लागतील

**निविदाकाराची स्वाक्षरी / नांव व शिक्का**

**प्रपत्र — ६**

**(निविदाधारककाकडून प्राधिकृत प्रतिनिधीस निविदा कार्यवाहिस्तव दिलेले प्राधिकार पत्र)**

दिनांक: /        /२०२२

प्रति,
मा.कार्याध्यक्ष,
९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन,
उदगीर, जि. लातूर.

**विषय : चहा नाश्ता व भोजन पुरवठा निविदा कार्यवाहिस्तव निविदाधारक यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधीम्हणून प्राधिकार सादर करणे बाबत...**

**महोदय,**

आम्ही ________________________________ आपल्या कार्यालयाचे स्तरावरील दिनांक २१ एप्रिल २०२२ ते २५ एप्रिल २०२२ पर्यंत आयोजीत विविध कार्याक्रमाकरीता राबविण्यात येणारी भोजन पुरवठा निविदा क्रमांक ____________ असे निविदा कार्यवाहीकामी श्री/श्रीमती ______________________________ यांना निविदा प्रक्रियेत भाग घेणे, निविदा कार्यवाही संबंधीच्या बैठकीस उपस्थित राहणे, निविदा दरात वाटाघाटी करुन संमती पत्र सादर करणे याकामी सर्वसंमतीने अधिकार प्रदान करुन सदर प्राधिकार पत्रान्वये निविदा कार्यवाहीस्तव प्राधिकृत करीत आहोत.

**आपला विश्वासू,**

**प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव निविदाकाराची नाव**
**पत्ता : पत्ता व शिक्का:**
**स्वाक्षरी : स्वाक्षरी :**

**सुचना : प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीने निविदा कार्यवाहीदरम्यान विहीत नमुन्यातील मूळ प्राधिकारपत्र व स्वत:चे ओळखपत्र(पॅनकार्ड / मतदानकार्ड/ड्राईविंग लायसन्स/ आधार कार्ड किंवा अन्य) दाखविणे अनिवार्य आहे.**

**शिफारस पत्र**

दिनांक /       /२०२२

श्री.________________________________________________यांचा चहा, नाश्ता व भोजन पुरविणेचा परवाना (परमीट) क्र. _______________हा असून त्यांना मी स्वत:गेल्या _______ वर्षापासुन चांगल्या प्रकारे ओळखतो. त्यांनी चहा, नाश्ता व भोजनाचा पुरवठा करतांना चांगला दर्जा राखला असल्याची माझी अनुभवाअंती धारणा झाली आहे.

आपला विश्वासु.

(____________________________)

**ओळख देणाऱ्याचे नाव :**

**व सही :**

- **किसान दोन व्यक्तींचे शिफारस पत्र सादर करावे.**

# ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनउदगीर , येथे विविध कार्यक्रमासाठी किमान नाश्ता व ,चहा (आवश्यकते प्रमाणे) व्यक्ती करीता ५००० व कमाल १०० भोजन मेनू चा तपशील

## मेनू भोजन ( जनरल )

| | | |
|---|---|---|
| .१ | स्वीट | जिलेबीपाईन ॲपल /बालूशाही/राजा राणी/गुलाबजाम/ मुगशिरा/मोहनथाळ /गव्हाची खीर/आमरस/मँगो बर्फी/शिरा यापैकी एक प्रत्येक जेवणात ( चक्की ) |
| .२ | दाळ | तुर दाळबेसन दाळ यापैकी एक /दाल तडका/कढी/सार/आमटी/ प्रत्येक जेवणात |
| .३ | रोटी | भाकरीधपाटे यापैकी दोन प्रत्येक जेवणात/परोठा/पुरी/चपाती/ |
| .४ | सुकी भाजी | बटाटाबैगण /भेंडी फ्राय/मटकी उसळ/ पिठल/झुनका/मसाला ंमिक्स/स्टफ शिमला/ व्हेजउसळ / यापैकी एक प्रत्येकी जेवणात |
| .५ | पातळ भाजी | व्हेज कुरमाइ यापैकी एक /चवळी/छोले मसाला/व्हेज कोपता/ प्रत्येकी जेवणात |
| .६ | राईस | साधामटर /व्हेज बिर्याणी/मसाला भात/खिचडी/पुलाव/जिरा/ राईस यापैकी एक प्रत्येक जेवणात |
| .७ | फरसाणनमकीन/ | बटाटा वडा कांदा/कचोरी/समोसा/पकोडाबटाटा भजी यापैकी / एक प्रत्येकी जेवणात |
| .८ | इतर | पापडगाजर ,कांदा ,लिंबु ,चटणी/ठेचा ,कोशिंबीर ,लोणचं , सर्व जेवणासोबत |
| .९ | नाश्ता | उपमा/मिसळ/उसळ/सुशिला/पोहे/इडली सांबर इयापैकी एक . |
| १०. | पेय<br>स ०८ ते १० वा<br>व<br>दु ०४ ते ०५ वाजता | सकाळी चहा, कॉफी, दुध बिस्कीटासह (गुड डे, पारले गोल्ड, मोनॅको, पतंजली या प्रकारातील) |

**नोट : उपरोक्त मेन्यू प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन तसेच समाविष्ट केलेले पदार्थ न दिल्याचे आढळल्यास संबंधीत ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.**

**शुद्ध मिनरल पाणी देण्यात यावे.**

### <u>हमीपत्र</u>

मी / आम्ही जाहिर करतो की, आम्ही भोजन पुरवठाकामी हे दरपत्रक (BOQ) सादर करण्यापूर्वी उपरोक्त दरपत्रकामध्ये आम्ही नोंदविलेले दर ज्यावर आधारलेले आहेत, ते स्थानिक परिस्थितीनूसार अन्नधान्य – किराणा माल, दूध, फळे, भाजीपाला व इतर किरकोळ मालाचा खदेदी खर्च, वाहतूक, जकात, टोल, अन्य, मंजूरी खर्च, आयकर, GST,कर व इतर अनिवार्य कर असा एकूण खर्च याबाबत सद्यस्थिती बजारभाव व संभाव्य महागाई याबाबत समग्र आढावा घेऊन तथा काळजीपूर्वक अभ्यास करुन नमूद

आहारप्रणालीनूसार भोजन पुरवठाकामी सर्व संमतीने वरीलप्रमाणे प्रति व्यक्ती दर रुपये (सर्व करांसहित) चहा, नाश्ता व भोजन पुरवठ्याचे दर विनाशर्त नोंदविलेले आहेत.

मी वरील प्रमाणे चहा, नाश्ता व भोजन मेनू देण्यास बांधिल असून नमुद मेनुनुसार चहा, नाश्ता व भोजन न पुरवल्यास देयकातून दंडात्मक रक्कम वसूल करण्यास माझी संमती असून कोणतीही हरकत राहणार नाही. वर नमुद केलेला प्रती व्यक्ती दर (सर्व करांसहित) चहा, नाश्ता व भोजनाचा दर मला मान्य व कबुल असून या दरास माझी संमती आहे. नोंदविलेल्या निविदा दरात कुठल्याही स्वरुपाची वाढ मिळण्याकामी माझा व हक्क राहणार नाही तथा निविदा कार्यवाहीसंदर्भात आयोजकाविरुध्द न्यायालयात तक्रार नोंदविणार नाही. सदर दरानुसार चहा, नाश्ता व भोजन पुरवठावेळी चहा, नाश्ता व भोजनाचे दर्जा – पुरवठाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास स्वागत समिती यांचा निर्णय अंतिम असून तो मला / आम्हाला बंधनकारक राहील व ते मला विनाशर्त मान्य आहे.

उक्त निविदेतील नमूद सर्व अटी – शर्ती ह्या मी / आम्ही काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला / आम्हाला विनाशर्त मान्य आहेत. मी असे प्रमाणित करतो की, निविदा नमूद दर इतर संस्था / विभाग / संघटनांना आकारण्यात आलेल्या दरापेक्षा जास्त नाहीत.

निविदा धारकाची स्वाक्षरी

# म. ए. सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

हीरकमहोत्सवानिमित्त आयोजित

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे

## ९५वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उदगीर जि. लातूर

**कालावधी २१ एप्रिल २०२२ ते २५ एप्रिल २०२२**

**संदर्भ**

**लिफाफा क्रमांक – २ (व्यापारी लिफाफा) (BOQ)**

१. **निविदाधारकाचे नाव व पत्ता** :_______________________________

२. **संमेलनामध्ये आयोजित विविध कार्यक्रमांसाठी एका वेळेस किमान** १०० **व कमाल** ५००० **व्यक्तीकरिता (आवश्यकते प्रमाणे) चहा, नाश्ता व भोजन पुरविण्याचे (प्रति व्यक्ती प्रति दिवस) दर**

(चहा, नाश्ता व भोजन पुरवठा निविदा क्रमांक -______________________________ )

**ठिकाण :** **निविदाधारकाचे नाव** : ________________

**दिनांक :** / /२०२२ **पत्ता** : ________________

________________

**स्वाक्षरी** :________________